वाचा :- जमाबदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख (म.राज्य) पुणे यांचे कडील परिपत्रक क्र.रा.भु.अ.आ.का.-४/प्र.क्र.-१६/डेटा दुरूस्ती आज्ञावली /१३ पुणे, दिनांक २०/५/२०१३

क्र./ रा.भू.अ.आ.का.४/ डे.दु. आ./प्र.क्र. १७ /२०१४
जमाबंदी आयुक्त आणि संचालक
भूमि अभिलेख (म. रा.) कार्यालय ,पुणे
दिनांक - २३/०७/२०१४

परिपत्रक

विषय :- डाटा दुरुस्ती आज्ञावली
अहवाल क्रमांक १ व ३ निरंक करणेबाबत.

राष्ट्रीय भूमि अभिलेख आधुनिकीकरण कार्यक्रम तथा ई-महाभूमि अंतर्गत विकसीत केलेल्या ई-चावडी व ई-फेरफार या आज्ञावलींची अंमलबजावणी संपुर्ण राज्यात सुरू आहे. यापुर्वी ७/१२ चे संगणकीकरण करताना मुळ डाटा एन्ट्री वेळी राहीलेल्या त्रुटी दुरूस्त करणेसाठी डाटा दुरुस्ती आज्ञावली विकसीत करुन सर्व वापरकर्त्यांना यापुर्वीच वितरीत करणेत आली आहे. त्याच बरोबर या कार्यालयाकडील वाचा सदरील दिनांक २०/०५/२०१३ चे परिपत्रकाव्दारे सविस्तर सुचना देण्यात आल्या आहेत. या आज्ञावलीचे वापराव्दारे ७/१२ च्या संगणकीकृत डाटा मध्ये असणा-या त्रुटी दर्शविणारे वेगवेगळे १५ अहवाल आपोआप तयार होतात. तसेच या त्रूटी दुर करुन आवश्यक दुरुस्ती करण्यासाठी दुरुस्तीच्या सुविधा पुरविणेत आल्या आहेत. त्याप्रमाणे राज्यभर आज्ञावली वापर सुरू आहे.

डाटा दुरुस्ती आज्ञावली मधील अहवाल क्रमांक १ हा " गाव नमुना ७/१२ वरील क्षेत्रफळ सदरी नमुद केलेले एकुण क्षेत्र व ७/१२ सदरी नमुद असलेल्या खातेदांराच्या नावासमोर नमुद असलेल्या क्षेत्राची बेरीज यांचा मेळ नसणारे गट नंबर /सर्व्हे नंबर दर्शवितो." तसेच अहवाल क्रमांक ३ हा " गाव नमुना १ व ७ मधील क्षेत्राचे फरकाचा आहे. " हे दोन्ही अहवाल निरंक करणे हे वर नमूद २०/०५/२०१३ च्या परिपत्रकानुसार अनिवार्य केलेले आहे. तथापी हे दोन्ही अहवाल निरंक करताना अडचणी येत असुन जास्त कालावधी लागत असलेबाबत विभागीय आयुक्त कोकण व नाशिक यांनी दिनांक २८/०६/२०१४ चे पुणे येथील राज्यस्तरीय परिषदेमध्ये नमुद केले होते. त्यानुसार यावर विचार करणेसाठी डोमेन एक्सपर्ट ग्रुपची बैठक जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख (म.राज्य), पुणे यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ९/०७/२०१४ व २१/०७/२०१४ रोजी घेणेत आली. त्या बैठकीत झालेली

चर्चा व घेतलेले निर्णयाप्रमाणे अहवाल क्रमांक १ व ३ निरंक करणेबाबत खालील प्रमाणे सुधारीत सुचना देणेत येत आहेत.

अहवाल क्रमांक- १

या अहवालामध्ये गाव नमुना नंबर ७/१२ वरील क्षेत्र रकान्यात (जिरायत, बागायत इ.) दर्शविलेल्या लागवडी योग्य क्षेत्राचा मेळ धारक सदरी दर्शविलेल्या लागवडीयोग्य क्षेत्राशी घेतला जातो. तसेच ७/१२ वरील पोट खराबा क्षेत्राचा मेळ धारकांच्या सदरी दर्शविलेल्या पोटखराब क्षेत्राशी घेतला जातो.

सद्यस्थीतीत गाव नमुना नंबर ७/१२ वर लागणीलायक व पोट खराब क्षेत्र खालील प्रमाणे विविध प्रकारे दर्शविणेत येते.त्याचे उदाहरण पुढीलप्रमाणे आहे.

गाव नमुना नंबर ७ वरील नमूद क्षेत्र (हे.आर. चौ.मी.)	गाव नमुना नंबर ७ वरील भोगवटादाराचे नावासमोरील नमुद क्षेत्र (हे.आर चौ.मी.)		
	उदाहरण क्र.१	उदाहरण क्र.२	उदाहरण क्र.३
	ला. पो. ख.	ला. पो. ख.	ला. पो. ख.
लागणीलायक	'अ' धारक ५ . ०.० ०.०.०	'अ' धारक ५ . ०.० १.०.०	'अ' धारक ६ .०.० ०.०.०
क्षेत्र - १०.०.० पोट खराबा क्षेत्र - २.०.०	'ब' धारक ५ . ०.० ०.०.०	'ब' धारक ५ . ०.० १.०.०	'ब' धारक ६ .०.० ०.०.०

अहवाल क्र.१ निरंक करण्यास सुधारीत पर्याय खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

अ) भोगवटादाराचे नावासमोर फक्त लागवडी योग्य क्षेत्र नमूद असल्यास

पर्याय १- लागवडी योग्य क्षेत्राची एकूण बेरीज ही गाव नमुना नंबर ७ मधील नमूद एकूण लागवडी योग्य क्षेत्राशी मेळाशी असावे. (उदा. क्र.१)

पर्याय २- भोगवटादाराचे नावासमोर नमूद असलेले लागवडी योग्य क्षेत्र याची एकूण बेरीज ही गाव नमुना नंबर ७ वरील लागवडी योग्य + पोट खराब क्षेत्र यांचे एकूण बेरजेशी मेळात असावे .(उदा. क्र.३)

ब) भोगवटादाराचे एक किंवा अनेक नावांचे समोर लागवडी योग्य क्षेत्र व पोट खराब क्षेत्र नमूद असल्यास

भोगवटादाराचे नावासमोर नमूद असलेले लागवडी योग्य क्षेत्र + पोट खराब क्षेत्र याची एकूण बेरीज ही गाव नमुना नंबर ७ वरील लागवडी योग्य क्षेत्र + पोट खराब क्षेत्र यांचे एकूण बेरजेशी मेळात असावे .(उदा क्र.२)

असा मेळ घेतलेनंतर बहुतांश अहवाल क्रमांक-१ निरंक होईल. त्याअनुषंगाने आज्ञावलीत दुरुस्ती करुन सुधारीत व्हर्जन १.३.१ रिव्हिजन २ राष्ट्रीय सुचना विज्ञान केंद्र पुणे यांचे मार्फत रिलिज करण्यात आली आहे. ऊर्वरीत गट नंबर /सर्व्हे नंबर चा मेळ अभिलेखावरुन पडताळणी करुन घेण्यात यावा व अहवाल निरंक करावा.

अहवाल क्रमांक -३

अहवाल क्रमांक -३ हा प्रत्येक गट नंबर /सर्व्हे नंबर चे गाव नमुना नंबर १ मधील क्षेत्र (लागणीलायक + पोट खराब) व ७/१२ वर नमुद केलेले क्षेत्र (लागणीलायक + पोट खराब) यातील फरक असणारे गट नंबर /सर्व्हे नंबर दर्शवितो. हा अहवाल निरंक करताना यापूर्वी गाव नमुना नंबर १ मधील सर्व्हे नंबर मध्ये पडलेले हिस्से अथवा गट नंबर मध्ये पडलेले हिस्से (हिस्सावार आकारबंद) विचारात घेणेत आले नव्हते. यामुळे हा अहवाल निरंक होणेमध्ये अडचणी येत होत्या. आता आज्ञावलीमध्ये अहवाल क्रमांक ३ हा सुधारीत करण्यात आला आहे. त्यामध्ये हिश्यांचे क्षेत्राचा तसेच बिनशेती क्षेत्राचा मेळ घेण्यासाठी पुढील निर्णय घेण्यात आला आहे.

पर्याय क्र.१ - ज्या गा.न.नं. ७ मधील पोटहिस्स्यामध्ये बिनशेती क्षेत्र नमूद नाही.

गाव नमुना नंबर १ मधील सर्व्हे नंबर / गट नंबर व त्यांचे हिस्से यामधील लागवडी योग्य क्षेत्र हे गाव नमुना नंबर ७ वरील संबंधित सर्व्हे नंबरच्या सर्व हिश्श्यांचे लागवडी योग्य क्षेत्र यांच्याशी मेळ असावा. त्याचप्रमाणे गाव नमुना नंबर १ मधील गट नंबर /सर्व्हे नंबर व त्यांचे हिस्से यामधील पोट खराब क्षेत्र हे गाव नमुना नंबर ७ वरील संबंधित सर्व्हे नंबरच्या सर्व एकूण हिश्श्यांचे पोट खराब क्षेत्र यांच्याशी मेळात असावे.

पर्याय क्र.२ - ज्या गा.न.नं. ७ मधील पोटहिस्स्यामध्ये बिनशेती क्षेत्र नमूद आहे.

गाव नमुना नंबर १ मधील सर्व्हे नंबर / गट नंबर व त्यांचे हिस्से यामधील लागवडी योग्य क्षेत्र + पोट खराब क्षेत्र याची बेरीज गाव नमुना नंबर ७ वरील संबंधित सर्व्हे नंबरच्या सर्व एकूण हिश्श्यांचे लागवडी योग्य क्षेत्र + पोट खराब क्षेत्र + बिनशेती क्षेत्र यांच्याशी मेळ असावा.

असा मेळ घेतलेनंतर बहुतांश अहवाल क्रमांक-३ निरंक होईल. त्याअनुषंगाने आज्ञावलीत दुरुस्ती करुन सुधारीत व्हर्जन १.३.१ रिव्हिजन २ राष्ट्रीय सुचना विज्ञान केंद्र पुणे यांचे मार्फत रिलिज करण्यात आली आहे. ऊर्वरीत गट नंबर /सर्व्हे नंबर चा मेळ अभिलेखावरुन पडताळणी करुन घेण्यात यावा व अहवाल निरंक करावा.

वर नमुद प्रमाणे अहवाल क्र. १ व ३ मध्ये मेळ न बसलेल्या गट नंबर /सर्व्हे नंबर चा मेळ अभिलेखावरुन घेणेत यावा. तथापी विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करुन देखील मेळ घेणे व दुरुस्त्या करणेस विलंब होत आहे असे निदर्शनास आल्यास असे उर्वरीत गट नंबर /सर्व्हे नंबर मेळ बसेपर्यंत

ऑनलाईन फेरफारासाठी प्रलंबित (Block) ठेवण्यात येतील. त्यामुळे अशा गट नंबर /सर्व्हे नंबर वर ई-फेरफार आज्ञावलीद्वारे ऑनलाईन फेरफार तूर्त घेता येणार नाहीत. मेळ घेणेच्या विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करुन या गट नंबर /सर्व्हे नंबर चा मेळ घेणे पुर्ण झालेनंतर असे गट नंबर /सर्व्हे नंबर ऑनलाईन पध्दतीने फेरफार घेणेसाठी आपोआप उपलब्ध (Unblock) होतील. ऑनलाईन फेरफारासाठी प्रलंबित ठेवण्यात आलेल्या गट नंबर /सर्व्हे नंबर ची गाव निहाय यादी डीबीए / तहसिलदार यांनी तपासून संधारण करावी व ऑनलाईन फेरफार सुरु झालेपासुन दोन महिन्यांचे आत नियमानूसार दुरुस्ती पुर्ण करुन मेळ घेण्याची कार्यवाही करावी.

(चंद्रकांत दळवी)
जमाबंदी आयुक्त आणि संचालक
भुमि अभिलेख (म.राज्य)पुणे

प्रत :- मा.अपर मुख्य सचिव (महसूल) , महसूल व वन विभाग, मंत्रालय मुंबई, यांना माहितीसाठी.

प्रत :- मा. सचिव माहीती तंत्रज्ञान, मंत्रालय मुंबई, यांना माहितीसाठी.

प्रत :- विभागीय आयुक्त (सर्व) यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.

प्रत :- श्री. आर.आर.राणे, उपमहानिदेश,राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र, पुणे यांना माहिती व कार्यवाहीसाठी

प्रत :- जिल्हाधिकारी (सर्व) यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.

प्रत :- उपसंचालक भूमि अभिलेख (सर्व) यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.

प्रत : - डिस्ट्रीक्ट डोमेन एक्सपर्ट (सर्व) यांना माहिती व कार्यवाहीसाठी.

प्रत :- जिल्हा अधीक्षक भुमि अभिलेख (सर्व)यांना माहिती व कार्यवाहीसाठी.

प्रत:- उपविभागीय आधिकारी (सर्व) यांना माहिती व कार्यवाहीसाठी.

प्रत :- जिल्हा सुचना विज्ञान अधिकारी (सर्व) यांना माहिती व कार्यवाहीसाठी.

प्रत :- तहसिलदार (सर्व) यांना माहिती व कार्यवाहीसाठी.